> अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणारांच्या मेंदूचा गुण होय.

# मानसिक व शारीरिक प्रेम–२

मत्सराचे परिणाम जर अितके भयंकर होत नसते, तर हा विकार हास्यास्पदच वाटला असता. मत्सरी नवरा जणूं काय आपल्या बायकोला विचारीत असतो, 'माझ्याशिवाय दुसऱ्या कोणाला तूं आपल्या जननेंद्रियाचा उपयोग करूं दिलास की काय? मला हें बिलकुल खपणार नाही.' यापेक्षा अधिक हास्यास्पद काय आहे? स्पिनोझाने लिहिलें आहे की अशा मनुष्याच्या मनांत नेहमी आपल्या पत्नीने अितरांशीं केलेल्या समागमाचीं स्पष्ट चित्रें उभीं राहतात आणि त्यांमुळें त्याला वेड लागण्याची वेळ येते.

दुर्दैवाने हें हास्यास्पद मानून भागत नाही. प्रसिद्ध फ्रेंच लेखक म्युसे याने आपली प्रेमिका 'जॉर्ज सां' (हें अेका फ्रेंच लेखिकेचें टोपणनांव आहे) हिला पॅजेलो नांवाच्या माणसाबरोबर अेकाच पेल्यांतून पितांना पाहिल्यामुळें तो आजारी पडला, हें अैकून लोकांना हंसूं आलें तर नवल नाही. पण मत्सरामुळें खून झालेले पाहून कोणाला हंसूं येअील? हा विकार जोंपर्यंत आहे, तोंपर्यंत कामस्वातंत्र्याने सहज मिळणारें सुख कसें शक्य होअील?

मत्सर हा मालकीहक्कापासून उत्पन्न होतो आणि घरांत शिरलेल्या चोराला कोणीं गोळी घातली तरी तें कायद्याच्या दृष्टीने जसें क्षम्य असतें, तसेच मत्सराने झालेले खूनही क्षम्य असतात. याशिवाय आणखीही भयंकर प्रकार मत्सरामुळें होतात. जिनीव्हा शहरांत अेका अत्यंत सुंदर स्त्रीने

अेका श्रीमंत व्यापाऱ्याशीं लग्न केलें आणि त्यानंतर अेका वर्षाने तिने आपल्या चेहऱ्यावर आम्ल ओतून स्वतःला विद्रूप करून घेतलें, तेव्हां तिच्या आओीने जांवयावर क्रौर्याबद्दल फिर्याद केली. खटला कोर्टांत आल्यावर बायकोने सांगितलें की हा आरोप खरा नाहां. मीच स्वतःच्या चेहऱ्यावर आम्ल ओतून घेतलें, कारण माझ्या सौंदर्याने लोक आकृष्ट होत असत आणि याबद्दल नवरा मला नेहमीच दोष देत असे. तेव्हां माझें प्रेम सिद्ध करण्याकरतां मी असें केलें. आतां लोक माझ्याकडे पाहणार नाहीत आणि याबद्दल नवरा मला दोष देणार नाही. पण हें तिने केलें नसतें, तर नवऱ्याने तिचा खून केला असता आणि तो कायद्याला मान्य झाला असता. हे सर्व मालकीहक्काच्या कल्पनेचे परिणाम आहेत. हे खून प्रेमाच्या नांवाने होतात, पण तें खरें प्रेम नसून मालकीहक्क असतो हें उघड आहे. ज्याचें बायकोवर बिलकुल प्रेम नाही, आणि ज्याने बायकोला टाकलेली आहे, अशा मनुष्याचा सुद्धां मत्सर कायम राहतो, कारण त्याने मालकीहक्कावर पाणी सोडलेलें नसतें आणि अशा माणसाने बायकोला आणि तिच्या प्रियकराला ठार मारल्याचीं उदाहरणें आहेत. अेखादा कुत्रा अेखादें हाड नीरस म्हणून टाकून देतो, पण दुसरा अेखादा कुत्रा तें घेऊं लागल्यास तो त्याच्यावर हल्ला करतो, तसेंच हें आहे.

अशा प्रकारचा मत्सर मुलांत व आओीबापांत परस्परांविषयीं दिसतो. लहान मुलें विशेषतः आईला आपली मालमत्ता समजतात आणि तिने दुसऱ्या अेखाद्या मुलाला किंवा स्वतःच्या भावंडांना देखील जवळ घेतल्यास त्यांना विलक्षण मत्सर वाटतो. हा मत्सर अर्थातच अत्यंत स्वार्थी असतो, कारण मुलांना आओीबापांचा अत्यंत उपयोग असतो. त्याचप्रमाणें आओीबापांनाही मुलें दूर झालेलीं खपत नाहीत. तींही मुलांना आपली मालमत्ता समजतात आणि पुष्कळ वेळां लग्नाकरतां उत्तम स्थळ मिळालें तरी तीं त्यांत मोडता घालतात. यांत तीं मुलांचें हित पहात नाहीत, स्वतःचेंच समाधान त्यांना जास्त महत्वाचें वाटतें.

# मानसिक व शारीरिक प्रेम-२

मत्सराचा आणखी अेक प्रकार म्हणजे कित्येक लोकांत कोणी पाहुणा आल्यास त्याच्या सत्काराकरतां स्वतःची बायको त्याच्याकडे पाठवण्याची पद्धत आहे. यावेळीं नवरा त्यांच्या संबंधाला परवानगी देतो, परंतु त्याच्या परवानगीशिवाय जर ती कोणाकडे गेली तर तो तिचा खून देखील करतो. म्हणजे स्त्री ही मालमत्ता आहे, नवरा पाहिजे तर ती कोणाला उसनी देअील, पण तिच्या खुषीचा त्यांत संबंध नाही. मालमत्तेला मत नसतें.

स्त्रियांचा मत्सरही मालकीहक्कावरच आधारलेला असतो, कारण ज्या देशांत अनेक बायका करण्याची चाल असते, तेथें स्त्रियांना अर्थातच नवऱ्यावर मालकीहक्क नसतो, यामुळें त्यांना मत्सरही वाटत नाही आणि अितर बायकांची निवड करण्यांत त्या नवऱ्याला मदतही करतात. हिंदुस्थानांतही अेका बायकोला मूल न झालें तर ती नवऱ्याला दुसरी बायको करण्याचा सल्ला देते आणि ती निवडूनही देते, अशीं पुष्कळ उदाहरणें घडतात. यावरून मत्सराचा पायाच मालकीहक्क हा असतो.

तेव्हां हा मालकीहक्क नाहीसा झाल्यास मत्सरही शिल्लक रहाणार नाही हें उघड आहे. अर्थात् खऱ्या प्रेममुळेंही थोडाबहुत मत्सर वाटणें शक्य आहे, पण मालकीहक्क नसला म्हणजे त्याचे हल्लीसारखे भयंकर परिणाम होणार नाहीत. आपल्या प्रेमपात्राचें दुसऱ्या व्यक्तीवर प्रेम बसलें तर वाअीट वाटणें साहजिक आहे, परंतु मालकीहक्क नसल्यास ती अेक नैसर्गिक आपत्ति वाटेल अितकेंच.

कामस्वातंत्र्य रूढ झाल्यास मालकीहक्क शिल्लक राहणार नाही आणि मत्सराचे हल्लीचे भयंकर परिणामही टळतील. हल्लीही अशीं कांही उदाहरणें घडतात की अेकमेकांवरचा मालकीहक्क सोडून देऊन पतिपत्नी अेकमेकांना पाहिजे तसें वागण्याची परवानगी देतातत आणि अशी मोकळीक दिल्यावर त्यांना मत्सर वाटत नाही. वरील उदाहरणांवरून हें उघड होतें की आपल्या बायकोचा दुसऱ्या पुरुषाशीं संबंध झाला म्हणून मत्सर वाटतो असें नसून आपल्या मालकीहक्काला धक्का पोंचला तरच मत्सर वाटतो.

पतीच्या व्यभिचाराने पत्नीला कांही कमीपणा येत नाही व पत्नीच्या व्यभिचाराने मात्र पतीला कमीपणा येतो, ही कल्पनाच हास्यास्पद आहे, परंतु जेथें अेकपत्नीत्वाचा कायदा आहे,अशा देशांतही ही कल्पना रूढ आहे. असा कायदा हें केवळ ढोंग असतें, प्रत्यक्ष वागणुकींत तो शिल्लक रहात नाहीं.

चालू कामनीतींत मत्सर हा अेक सद्गुण समजला जातो असें दिसतें. निदान त्यांत कांही चूक नाही अशी समजूत असल्यामुळेंच मत्सरमूलक खुनाला शिक्षा होत नाही. तो नवऱ्याचा हक्कच आहे असें लोकमत आहे, अितकेंच नव्हे तर अेखाद्या पुरुषाला जर मत्सर वाटला नाही, तर त्याचें आपल्यावर प्रेमच नाही असें स्त्रिया समजतात. पण मत्सराचा प्रेमाशीं संबंध नाही. प्राचीनकाळीं रोमन लोकांत बापाला मुलाचा जीव घेण्याचा हक्क होता, कारण मुलें ही बापाची मालमत्ता होती. तशीच स्त्री ही मालमत्ता असल्यामुळें तिलाही ठार मारण्याचा हक्क उत्पन्न होतो. यांत प्रेमाला काय स्थान आहे? युरोपांतील पुष्कळ देशांत दोन माणसांचें भांडण द्वंद्वयुद्धाने सोडव-ण्याची चाल होती, पण हल्ली द्वंद्वयुद्धांत कोणाला मारणें म्हणजे खूनच समजून कायद्याने त्याला शिक्षा सांगितली आहे. पण अजूनही मत्सराने केलेल्या खुनाला शिक्षा होत नाही. विवाहाने पत्नीशीं संभोगाचा मक्ता पतीला मिळतो असें दिसतें आणि या मक्त्याने तिच्या खुनाचाही हक्क मिळतो असें दिसतें.

प्राथमिक गटांचे अभ्यासक जे. जी. फ्रेझर यांनी लिहिलें आहे की यूरोपच्या उत्तरेकडील अेस्किमो आणि हिंदुस्थानच्या दक्षिणेकडील टोड लोक हे सर्व जगांत अधिक शांतताप्रिय लोक आहेत. ते कधीही युद्धांत पडलेले नाहीत, परंतु हेच दोन गट सर्व जगांत अनैतिक म्हणून प्रसिद्ध आहेत, कारण नीति या शब्दाचा अर्थच कामविषयक अेकनिष्ठता असा झाला आहे. या दोन्ही लोकांत कामविषयक निर्बंध नाहीत आणि यामुळें मत्सरही नाही. मानव-जातींत या विशिष्ट प्रकारच्या मत्सरामुळें अनेक खून, मारामाऱ्या, भांडणें, युद्धें, महायुद्धें झालेलीं आहेत. कुटुंबसुखाची लोक कितीही स्तुति करोत, पण

मत्सरामुळें होणारे अनर्थ हे या कुटुंबसंस्थेचेच आनुषंगिक आहेत, हेंही कबूल करावेंच लागतें.

जेथें कामस्वातंत्र्य नाही, म्हणजे अेकनिष्ठता हें कर्तव्य समजलें जातें, तेथें साहजिकच मत्सराला जागा मिळते आणि मग असे अनर्थ अपरिहार्यपणें होतात. पण कामस्वातंत्र्याच्या अमदानींत मत्सराला जागाच रहात नाही. अेक स्त्री पुरुषाला सोडून गेली, किंवा पुरुषाने स्त्रीचा त्याग केला, तरी विशेष दुःख करण्याचें कारण रहात नाही, कारण जगांत पुष्कळच पुरुष आणि स्त्रिया उपलब्ध असतात.

या बाबतींत प्रत्येकाला मनसोक्त वागण्याचा हक्क आहे अशी अेकदा खात्री झाली म्हणजे मत्सर वाटणार नाही. श्वेतकेतूच्या बापाने जसें त्याला सांगितलें की तुझी आई जरी दुसऱ्या पुरुषाबरोबर गेली तरी त्यांत विशेष कांही नाही, तो तिचा हक्कच आहे, तसेंच सर्वजण म्हणतील. शेंकडों वर्षांच्या चालू रूढीमुळें जरी अशा स्थितींतही मनुष्याच्या मनांत थोडाबहुत मत्सर उत्पन्न झाला, तरी तो स्वतःची समजूत घालूं शकेल की स्वातंत्र्याच्या अमदानींत हा आपलीच चूक समजली पाहिजे.

संभोगाने दुसऱ्याच्या शरीरावर हक्क उत्पन्न होतो, ही कल्पनाच हास्यास्पद आहे. कामस्वातंत्र्याचा फायदा घेउन अेखादी बायको जरी नवऱ्याला सोडून गेली, तरी आपलें कांही अडणार नाही असेंच तो समजेल. स्वातंत्र्याचा प्रत्येकाचा हक्क अेकदां कबूल केला, म्हणजे लोकांना मत्सर दाखवण्याची लाज वाटेल. सुंदर वस्तु आपल्याला पाहिजे आणि ती अेकट्याला मिळाली तर बरी, असें वाटणें साहजिक आहे, पण स्त्री ही वस्तु नाही, तिला आपलें स्वतःचें मत असतें, तिलाही आपल्याला स्वातंत्र्य पाहिजे असें वाटणें स्वाभाविक आहे, हें पुरुषांनी ओळखलें पाहिजे आणि तसेंच पुरुषांचे बाबतींत स्त्रियांनीही ओळखलें पाहिजे. मत्सर नाहीसा करण्यास कामस्वातंत्र्यासारखा दुसरा मार्ग नाही.

अर्थात् मत्सर हा विकार आपल्याला कमीपणा आणणारा आहे अशी

जरी बुद्धिवादाने खात्री झाली, तरी तो कांही अंशीं नैसर्गिक असल्यामुळें, आणि शेंकडों किंवा हजारों वर्षें रूढ झालेल्या मालकीहक्कांच्या कल्पनेने त्याला आधार मिळाला असल्यामुळें तो अजीबात नाहीसा करणें सोपें नाही बुद्धिवाद्याच्या मनांतही हा विकार उत्पन्न होत नाही असें नाही. आपली पत्नी दुसऱ्याकडे गेली तरी तत्वतः ज्यांची हरकत नसते, त्यांना देखील हा विकार सोडीत नाही जज्ज लिंडसे यांनी काही सुविचारी बायकांबद्दल लिहिलें आहे की नवरा दुसरीकडे गेला तरी त्यांची हरकत नसते, पण त्याने तें आपल्या नकळत करावें, कळल्यास आपल्याला वाअीट वाटतें, असें त्यांचें म्हणणें असतें.

तेव्हां केवळ बुद्धिवादाने हा विकार मनांतून कहून टाकणें कठिण असतें यांत शंका नाही आणि सामान्य माणसांना तें अशक्य होतें यांत नवल नाही. कामस्वातंत्र्य ज्यांना तत्वतः मान्य आहे, अशा माणसांनी देखील संतापाच्या भरांत खून केल्याचीं उदाहरणें आहेत. हल्लींचा समाज मत्सराला उत्तेजनच देतो, कारण अशा खुनाबद्दल शिक्षा होत नाही अितकेंच नाही तर स्त्रीचा व्यभिचार समजल्यावर जो चिडत नाही आणि खून करीत नाही, त्याला षंढ म्हणण्यापर्यंत लोकांची मजल जाते.

तेव्हां बुद्धिवादाने जरी मत्सर अजीबात नाहीसा होत नाही, तरी समंजस मनुष्य निदान अशा वेळीं स्वतःला आवरण्याचा प्रयत्न करील आणि त्याचे परिणाम मर्यादित राहतील. अितकें कबूल करून सुद्धां कामस्वातंत्र्याने मत्सराला बराच आळा बसेल यांत शंका रहात नाही, कारण स्वातंत्र्यामुळें वैचित्र्याचा अनुभव सर्वांना शक्य होअील आणि हा अनुभव आल्यावर अमुक अेका व्यक्तीचें महत्व फारसें रहात नाही. अेक गेली तर गेली, दुसऱ्या पाहिजे तितक्या मिळूं शकतील, ही कल्पना मनांत दृढ झाली, म्हणजे मत्सर आपोआपच कमी होअील. या दृष्टीने रूढींत कोणते फरक होणें अिष्ट आहे याचा विचार पुढें करूं.

---

# पहिली अखिलभारतीय संततिनियमन परिषद्

ही परिषद् येथील कुटुंबनियोजनसंस्थेने बोलावली होती. या संस्थेच्या अध्यक्ष लेडी रामराव व चिटणीस मिसेस वॅवू या दोन्ही अत्यंत उत्साही स्त्रिया आहेत आणि त्यांच्याच अविश्रांत मेहनतीने ही परिषद यशस्वी झाली. परिषदेला किती लोक येतील याचा अंदाज करणें अशक्य होतें. फारसे येणार नाहीत म्हणून प्रथम अेक लहान सभागृह घेतलें होतें. तेथें फक्त दोनशेंच माणसें बसूं शकलीं असतीं, परंतु तेवढी जागा पुरणार नाही असें दिसतांच अयत्या वेळीं वाय्. अेम्. सी. अे. या क्रिस्ती संस्थेचें सभागृह घ्यावें लागलें व तें अगोदर न कळल्यामुळें अनेकांची गैरसोय झाली. पहिल्या दिवशीं निदान पांचशें तरी माणसें हजर होतीं आणि त्यांपैकीं अनेकांना उभें रहावें लागलें. अर्थात् यांत प्रतिनिधींची वर्गणी भरलेले फारच थोडे, म्हणजे १०५ होते. बाकीचे फुकटेच होते, पण त्यांना बंदी नव्हती.

परिषदेचे अध्यक्ष हल्ली बडोद्याच्या विद्यापीठांत काम करणारे डॉ. चंद्रशेखर होते. त्यांनी हिंदुस्थानच्या लोकसंख्येचा खोल अभ्यास केलेला असल्यामुळें त्यांची निवड योग्यच होती. तेही अत्यंत उत्साही गृहस्थ असल्यामुळें परिषद् कंटाळवाणी झाली नाही. अध्यक्षांच्या भाषणांत सर्व महत्वाचे मुद्दे आले होते आणि भाषणाच्या प्रती सर्वांना वांटल्या होत्या.

अितरही अनेक महत्वाचे निबंध वाचले गेले त्या सर्वांचाच येथें परामर्ष घेणें शक्य नाही, तरीपण कांहीं महत्वाच्या निबंधांचा उल्लेख करणें जरूर आहे. आणि त्यापूर्वी आमच्या आरोग्यमंत्री राजकुमारी अमृत कौर यांची अेक कारवाआी सांगितली पाहिजे. या बाआी आजपर्यंत नेहमी संततिनियमनाविरुद्ध बोलत आल्या आहेत, निदान तें करणेंच असेल तर आत्मसंयमनानें करावें, असे गांधीछाप उपाय सांगत आल्या आहेत, परंतु पंडित नेहरू अलीअडे संततिनियमनाच्या बाजूने बोलल्यामुळें आतां सरकार या

बाबतींत कांहीतरी नक्की करणार, अशी भीति वाटून त्यांनी त्यावर अेक युक्ति योजली आणि अेका खोट्या. फसव्या पद्धतीचा पुरस्कार करण्याकरतां अेक अमेरिकन तज्ञ सरकारी खर्चानें येथें बोलावून त्याला सक्त ताकीद दिली की त्याने फक्त याच पद्धतीचा पुरस्कार केला पाहिजे. या निमंत्रणावरून डॉ. अेब्राहाम स्टोन यांनी येथें येऊन 'रिदम' पद्धतीचा पुरस्कार केला. ही पद्धत अनेक वर्षांपूर्वी क्नाउस नांवाच्या अेका युरोपीय डाक्तराने आणि ओजीनो नांवाच्या अेका जपानी डाक्तराने पुरस्कारली. या पद्धतीचा सारांश असा की स्त्रियांच्या दोन मासिक स्त्रावांत जें सुमारें महिन्याचें अंतर असतें, त्यांपैकीं फक्त कांही दिवसांतच गर्भधारणेची शक्यता असते, बाकीच्या दिवसांत नसते. तेव्हां या धोक्याच्या दिवसांत समागम वर्ज्य केला म्हणजे भीति नाही. स्त्रीचें बीज मासिक स्राव सुरू होण्यापूर्वी १४ दिवस पक्व होऊन बीजकोशांतून बाहेर पडून गर्भाशयाकडे येऊं लागतें व तें दोन दिवसांनी पडून जातें तसेंच पुरुषाचें बीज समागमाचे वेळीं स्त्रीच्या शरीरांत शिरल्या-वर तीन दिवसांपेक्षां जास्त जगत नाही, तेव्हां महिन्यापैकीं मधले दहा दिवस वर्ज्य करावे, असा सोपा उपाय त्यांनीं काढला. पण हा उपाय पुष्कळ वेळां फसतो असें सिद्ध झालें आहे, तेव्हां वरील मूलसिद्धांतांपैकीं सर्वच बरोबर नसावे असें अनुमान निघतें.

पण या तथाकथित नैसर्गिक पद्धतीला कॅथोलिक पंथाचे धर्मगुरु जे पोपसाहेब, त्यांचा पाठिंबा आहे, कारण तिला कृत्रिम साधनें लागत नाहीत. आतां कॅथोलिक लोक या पद्धतीने फसले तर त्यांत पोप साहेबांचें काय गेलें ? त्यांच्या कळपांतील मेंढरांची संख्या वाढली तर बरेंच, तितका धर्माचा प्रसार जास्त होईल. आपल्या आरोग्यमंत्री त्याच पंथाच्या असल्यामुळें त्यांनी ही फसवी पद्धत पुरस्कारण्याकरतां अमेरिकन तज्ञ बोलावला. उद्देश हा की अेवढा अगडबंब तज्ञ बोलला की बहुसंख्य अडाणी भारतीयांचा तीवर विश्वास बसेल. पण सर्वच भारतीय अडाणी नसल्यामुळें त्यांची ही कारवाई उघडकीस आली आणि डॉ. स्टोन यांना अनेकांनी छेडतां त्यांनी

कबूल केलें की सरकारी खर्चाने या पद्धतीचा पुरस्कार करण्याकरतां मी येथें आलों आहें, तेव्हां मला तें करणें भाग आहे. येथें डाक्तरांच्या सभेंत तर त्यांची त्रेधाच झाली.

या परिषदेंत आम्हाला आमचे तीस वर्षांतील अनुभव सांगण्याची विनंति केली होती, परंतु पुरेसा वेळ न मिळाल्यामुळें या पद्धतीविषयीं बोलायचें राहिलें. तेव्हां नंतर आम्हांस सँटाक्रूझ येथील डॉ. काशीबाअी अवसरे यांनी विचारलें की यासंबंधी तुम्ही कां बोललां नाही? वेळ मिळाला नाही असें सांगितल्यावर त्यांनी अध्यक्षांना विनंति केली की त्यांनी मला या पद्धतीविषयीं बोलायला सांगावें. तेव्हां या पद्धतींत सुरक्षित समजलेले दिवस बिलकुल सुरक्षित नसतात, आणि शिवाय वर्ज्य समजलेल्या दिवसांत स्त्रियांना कामवासना जास्त असते असें डॉ. मारी स्टोप्स यांचे अभ्यास-पूर्वक झालेलें मतही सांगितलें, तेव्हां या पद्धतीला जरी कृत्रिम साधनें लागत नसलीं तरी ती नैसर्गिक नाही, कारण भूक लागली असतां उपास करणें कोणीही नैसर्गिक म्हणणार नाही.

अेका काळचे अन्नवाटपांतले अधिकारी श्री. गोरवाला यांच्याही निबं-धाचा उल्लेख करणें जरूर आहे. लोकसंख्या अशीच वाढत गेली तर अन्न कधींही पुरें पडणार नाही, हें तर त्यांनी सांगितलेंच, पण धान्यापेक्षां अितर महत्वाच्या अन्नाची किती टंचाअी आहे, यावर त्यांनी जोर दिला. ते म्हणाले की गोधनाचे बाबतींत हिंदुस्थानचा नंबर बराच वर लागेल, परंतु दुधाचे बाबतींत मात्र तो अतिशय खाली आहे. शिवाय दुधाचे बाबतींत समृद्ध असलेला पंजाबचा बराच भाग पाकिस्तानांत गेल्यामुळें आपली स्थिति अधिकच वाअीट झाली आहे. गाअी जास्त असतांना दूध कमी मिळतें याचें कारण काय? यूरोपांत गोरक्षण नाही आणि येथें आहे, तरीपण यूरोपांत दुधही जास्त चांगलें मिळतें आणि गोमांसही जास्त चांगलें मिळतें. याचें कारण त्यांनी असें सांगितलें की गोरक्षणामुळें दुभत्या गुरांना पुरेसें अन्न मिळत

नाही. सध्यांच्या गुरांपैकीं निम्मीं गुरें जर आपण मरूं दिलीं, तर बाकीच्यांना अन्न पुरेसें मिळून दुधाची स्थिति ताबडतोब सुधारेल, पण गाओीची पूजा करणाऱ्या हिंदूंना हें सांगून काय उपयोग ? तशांत कांही शहाणे गोरक्षणाचा कायदा मागत आहेत ! हिंदूंची अक्कल जैन धर्माने खलास केली अ हे. वेद-कालीन हिंदू ( ब्राह्मण देखील ) गोमांस खात होते आणि त्यांना गोरसही उत्तम मिळत होता. गेलेली अक्कल परत कशी येणार ?

डॉ. स्टोन पुन्हा मिळणार नाहींत, म्हणून अध्यक्षांनी त्यांना प्रश्न विचारण्यास लोकांना परवानगी दिल्यामुळें त्यांत बराच वेळ गेला आणि अितरांना पुरेसा वेळ मिळाला नाही. तथापि कांही भाषणें अैकण्यासारखीं झालीं. श्री. कमलदेवींनी आपले सामाजिक कार्यांतले अनुभव सांगितले. शकुंतलाबाओी परांजपे यांनी पुणें येथील संततिनियमनकेंद्रांतील अनुभव सांगितले आणि त्यांनी ज्या तेल–चिंधी पद्धतीचा अलीकडे पुरस्कार केला आहे, ती एका वर्षांत १९४ स्त्रियांना सांगितली असतां त्यांपैकीं दोनच स्त्रिया गरोदर झाल्या, तेव्हां ही पद्धत जवळजवळ डच कॅप व जेलीच्या पद्धती-अितकीच यशस्वी आहे असें दिसतें.

शेवटच्या दिवशीं ही परिषद् खार येथील अखिलभारतीय महिला-परिषदेच्या शाखेच्या विनंतीवरून तेथें भरली होती व या शाखेच्या सभा-सदांनी प्रतिनिधींच्या दुपारच्या जेवणाचीही व्यवस्था आपआपसांत वांटून घेऊन केली होती. परगांवच्या प्रतिनिधींचा मुंबईंत राहण्याचा व जेवणाचा खर्च परिषदेने आपल्या अंगावर घेतला होता. अेकंदरींत परिषद् अपेक्षे-पलीकडे यशस्वी झाली आणि करमणुकीचे कार्यक्रम नसतांही अधिवेशनास, फुकट्यांची कां होअीना, पण गर्दी होती. कॅथोलिक पंथाने संततिनियमना-विरुद्ध प्रचार करणारें अेक चोपडें सर्वांना प्रवेशद्वारापाशीं वांटलें. या पंथाची पाताळयंत्रीपणाबद्दल आणि चिकाटीबद्दल प्रसिद्धि आहे आणि ती या परिषदेंत चांगली निदर्शनास आली. आमच्या बाजूच्या प्रचारकांना या विरोधामुळें अधिक जोर येअील अशी आशा आहे.

या वर्षी अशाच प्रकारची अेक आंतरराष्ट्रीय परिषद् भरणार आहे व तिला हिंदुस्थानकडून आमंत्रण गेलें आहे. जागा नक्की नाही, परंतु ती मुंबईत व्हावी असे प्रयत्न चालू आहेत. वरील संस्थेकडूनच ही खटपट होत आहे. यांत विशेष महत्वाची गोष्ट अशी आहे की या संस्थेंत बहुसंख्य सभासद स्त्रिया आहेत. हा विषय स्त्रियांनाच विशेष महत्वाचा आहे आणि त्यांना शेवटीं तो हातीं घेण्याची बुद्धि झाली आहे, तेव्हां आतां त्याचा प्रचार अधिक जोराने चालेल यांत शंका नाही.

आणखी अेक महत्वाची गोष्ट म्हणजे ज्या मुंबईच्या नगरसमितीने कित्येक वर्षेंपर्यंत गांधीप्रणीत अडाणीपणामुळें आणि कॉंग्रेसच्या हुकुमी बहुमतामुळें हा विषय फेटाळून लावला होता, त्याच नगरसमितीने कांही वर्षांपूर्वी संततिनियमन केंद्रें सुरू केलीं आणि आतां अशीं सात केंद्रें मुंबईत चालू आहेत. त्याच नगरसमितीच्या दिवाणखान्यांत प्रतिनिधींना मुंबईचे मेयरसाहेब श्री. स. का. पाटील यांनी चहा दिला आणि जो दिवाणखाना आम्ही कधीं पाहिलाही नव्हता, तेथें प्रथमच जाण्याचा प्रसंग या वेळीं आला आणि मेयरसाहेबांच्या टेबलाशींच आम्हाला स्थान मिळालें होतें. सर्व शहरांतील नगरसमित्यांना अशीच सुबुद्धि होवो, म्हणजे निदान शहरांतील लोकांना या बाबतींत सल्ला आणि गरिबांना साधनेंही मोफत मिळतील. अितकें तरी नगरसमित्याचें कर्तव्य समजलें पाहिजे.

---

# पडद्यांतील सत्यें-१

बेल्जिअममधील अेका डाक्तराने कांही महत्वाच्या प्रश्नांवर अेक प्रश्नपत्रिका तयार करून ती सुमारें अेक हजार स्त्रियांकडे पाठवली आणि उत्तरें मागवलीं. संततिनियमन, गर्भपात, कामस्वातंत्र्य, वगैरे प्रश्नांवर स्त्रियांचीं खरीं मतें समजणें कठिण किंवा अशक्य असतें, परंतु या मतांचे

त्यांना महत्व वाटल्यामुळें त्यांनी या पत्रिका फक्त स्त्रियांकडेच पाठवून उत्तरें मागवलीं आणि नांवें बाहेर फुटणार नाहीत असें केवळ आश्वासनच नव्हे, तर त्यासाठीं बेमालूम व्यवस्था केली. या बहुतेक स्त्रिया फ्रान्स व बेल्जिअम देशांतील होत्या व फारच थोड्या यूरोपांतील अितर देशांतील होत्या. यांपैकी ५६८ स्त्रियांकडून उत्तरें आलीं व कांहींनी त्यालाच जोडून स्वतःचा अितिहास लिहिला. यांपैकीं कांही हकीकती पुढें दिल्या आहेत.

यांना 'पडद्यांतील सत्यें' म्हणण्याचें कारण असें की यूरोपांतील स्त्रियांना जरी स्वातंत्र्य मिळाल्याचा बोलबाला सर्वत्र आहे, तरीपण हें स्वातंत्र्य जमेंत धरण्यासारखें नाही हें या हकीकतींवरूनच सिद्ध होतें. तेव्हां यूरोपांत स्त्रिया जरी प्रत्यक्ष पडद्यांत नसल्या तरी त्यांना पुरुषांप्रमाणें आपली मतें उघडपणें सांगतां येत नाहीत, पडदा पाळावा लागतो, असें दिसतें. बेल्जिअम व फ्रान्स या दोन्ही देशांतील भाषा फ्रेंच आहे व चालीरीतीही सारख्या आहेत.

**पहिली हकीकत**. अेक ३३ वर्षांची स्त्री ( नोंदणीविवाह झालेली व अेक मूल असलेली ) म्हणते, मला कामविषयक सर्व माहिती मिळवावीशी वाटते. समागमाचे वेळीं मूल होण्याची भीति वाटते, कारण फाजील मुलें होणें म्हणजे गरीबी येणार आणि मुलेंही दुःखीच होणार. ही भीति नाहीशी करणें शक्य असेल तरच दारिद्र्यांतून आणि गुलामगिरींतून मनुष्याची सुटका होअील.

**दुसरी अेक स्त्री** ( वय वीस वर्षें, अजून मूल नाही, दोन्ही पद्धतींनी विवाह झालेली. तिकडच्या कायद्याप्रमाणें विवाहाची नोंदणी करण्याची सक्ती आहे, मग धार्मिक विधि वाटल्यास करावा किंवा करूं नये. ) तिचे मतें विवाहसंस्था नष्ट झाली पाहिजे, परंतु यामुळें मिळणाऱ्या स्वातंत्र्याचा दुरुपयोग होऊं नये म्हणून १. तरुणतरुणींना शास्त्रीय पद्धतीने

शिक्षण मिळालें पाहिजे. २ सामाजिक प्रश्नांचा अभ्यास झाला पाहिजे, ३. राहणीचें मान सुधारलें पाहिजे, व ४. हल्लीच्या नीतिविषयक कल्पना बदलल्या पाहिजेत. समाजाची अेकंदर परिस्थिति सुधारल्याशिवाय या गोष्टी होणार नाहीत, पण याकरतां कामशास्त्रांतील तज्ञांनी व अितरांनीही कामस्वातंत्र्याकरतां झगडलें पाहिजे, म्हणजे धार्मिक आणि राजकीय अधिकारी आणि भांडवलवाले यांच्याशीं लढलें पाहिजे, कारण धर्मामुळें भलभलत्या कल्पनांचा प्रसार होतो आणि राजसत्तेला धर्माचा पाठिंबा पाहिजे असल्यामुळें सत्ताधारी नेहमी धर्माला उचलून धरतात, आणि भांडवलवाल्यांना या दोघांचाही पाठिंबा असल्यामुळें तेही स्वातंत्र्याचे शत्रुच असतात. तेव्हां या सर्व सत्तेचा नायनाट झाल्याशिवाय खरें स्वातंत्र्य मिळणार नाही आणि खऱ्या नीतीचा प्रसार होणार नाही. हेंच माझें ध्येय आहे आणि म्हणूनच मी हीं मतें आपणासमोर मांडलीं, कारण आपणही त्याच मार्गावर आहांत.

---

# ग्रंथपरीक्षण

१. बिल्वपत्र अथवा त्रिदळ, लेखक कवि बिंबाराम ( रामभाऊ टिळक ) किंमत ९ आणे.

या पुस्तकाची सजावट चांगली आहे, परंतु आंतील कवितांविषयीं मात्र तसें म्हणतां येत नाही. यांत मरहूम साहित्यसम्राट न. चिं. केळकरांना शिव्या दिल्या आहेत. केळकरांनीं टिळक बंधूंचें अत्यंत नुकसान आणि बदनामी केली यांत शंका नाही, प्रस्तुत लेखकाच्या कनिष्ठ बंधूवर त्यामुळें जीव देण्याची पाळी आली हेंही खरें. तथापि मेलेल्या माणसाला शिव्या द्याव्या की नाही हा प्रश्न बाजूला ठेवला, आणि या प्रत्येकीं १४ ओळींच्या तीन कवितांत दिलेल्या शिव्या अत्यंत योग्य आहेत असें जरी धरून चाललें, तरी

शद्बांची मोडतोड आणि व्याकरणाचा खून करूनही ज्यांना शार्दूलविक्रीडित वृत्ताच्या चरणांतील मात्र जमवतां येत नसतील, त्यांनी अेकतर कविता लिहूं नये ( कारण गद्यांतही शिव्या देतां येतात ) किंवा निदान कोणत्याही वृत्ताचा आभास उत्पन्न न करतां हा भलताच छंद सोडून मुक्तछंदाचा आश्रय करावा. ओळींची लांबी कमजास्त ठेवली म्हणजे मुक्तछंद होतो, तेव्हां तें कोणालाही कठिण जाऊं नये. असें केल्यास वाचक बुचकळ्यांत पडणार नाहीत.

र. धों. क.

---

# पत्रव्यवहार

## १

आपणास पूर्वी कांही प्रश्न विचारले होते व आपणाकडून उत्तरही आलेलें होतें, परंतु मला अजूनही कांही शंका आल्याने त्यांचें निवारण कराल अशी आहे. माझें वय २२ व उंची ५ फूट ८ अिंच असून वजन ११७ पौंड आहे. माझें शरीर व्यायामाने पीळदार झालें आहे, परंतु भरदार मात्र नाही. गेल्या वर्ष दीडवर्षापासून मला हस्तमैथुनाची संवय लागली आहे, परंतु तूर्त दररोज अेनिमा घेऊं लागल्यापासून थोडी कमी आहे. परंतु मला स्मश्रू अगदी तुरळक व खुरटी अशी आहे. माझ्या चेहऱ्यावर प्रमाणाबाहेर मुरमें आहेत व त्यांचा उगवण अजूनही चालूच आहे. सध्यां माझे विचारही अति उदास व निरुत्साही बनत चालले आहेत. आपण मागच्या पत्रांत असा व्यक्तिगत फरक असूं शकतो असें लिहिलें होतें. नुकतेंच माझे वाचनांत 'सेक्सॉलजी' मासिकाचा फे. १९५१ चा अंक आला. त्यांतील 'हॉर्मोन' संबंधी लेख वाचला. त्यावरून पाहतां त्यांनी अशा बाबतींत 'हार्मोन ट्रीटमेंट' (अंतःस्रावांचें उपचार) सुचवलेली आहे व त्यांचा मानसिक परिणामही चांगला होतो अशी शिफारस केली आहे. तरी सदरील

गोष्टींसंबंधी आपलीं मतें काय आहेत, सदरील उपाययोजना येथें होऊं शकते वा नाही, तसेंच जमल्यास ती कोण करूं शकेल, वगैरे सविस्तर माहिती दिल्यास मी आपला फार आभारी होईन. आपला श. रा. ठा.

उ. हस्तमैथुनाच्या संवयीने नुकसान न होतां नुकसान होण्याच्या भीतीनेच नुकसान होतें, असें आधुनिक तज्ञांचें मत आहे. अनिम्याची संवय लागल्यास ती जन्मभर टिकण्याचा संभव असतो, तेव्हां विशेष प्रसंगाशिवाय तो घेऊं नये. मुरुमांना विशेष घाबरण्याचें कारण नाही, कांही वयानंतर तीं आपोआप नाहींशीं होतात. यांत उदास होण्यासारखें कांही नाही. श्मश्रू वगैरेंचे बाबतींत अंतःस्रावांच्या उपचाराने उपयोग होण्याचा संभव आहे, परंतु हे उपचार तज्ञ डाक्तरांच्या सल्ल्याशिवाय करूं नये. डाक्तरांचीं नांवें देतां नाहीत. चांगल्या डाक्तरांची आपोआप प्रसिद्धि होते, तेव्हां चौकशी करावी. सं.

---

# शारदेचें पत्र

मी नुकतीच अेक कादंबरी वाचली, तींत असें दाखवलें आहे की अिंग्लंडांत कांही शास्त्रज्ञ सांथीच्या रोगांचा अभ्यास करीत होते आणि सांथींचा प्रतिबंध कसा करतां येअील याचा ते शोध करीत होते. सांथींत नेहमी असें आढळतें की कोणतेही उपाय न केले तरी सांथींची तीव्रता आपोआप कांही दिवसांनी कमी होते आणि नंतर सांथ संपते. हें कसें होतें आणि मनुष्यप्राणी खलास होअीपर्यंत सांथ कां चालू रहात नाही, याचें कारण असें सांपडतें की सांथ कांही काळ चालू राहिली म्हणजे रोगजंतूंना मारणारा अेक पदार्थ आपोआप उत्पन्न होतो आणि म्हणून सांथ कमी होते. पण कांही जंतु असे असतात की ते या पदार्थांशीं टक्कर द्यायला शिकतात आणि नंतरही ते टिकून राहतात आणि हे जंतु साहजिकच अितर जंतूंपेक्षा अधिक प्रबल असतात. हे प्रबल

जंतु जर कांही प्राण्यांच्या अंगांत टोंचून त्यांचेपासून प्रतिबंधक लस तयार करतां आली, तर तिचा उपयोग सांथीचा प्रतिबंध करण्याकडे करतां येअील.

या संशोधनाची खबर जेव्हां सरकारपर्यंत पोंचली, तेव्हां त्यांना अशी भीति पडली की या अतितीव्र जंतूंची बातमी जर अितर देशांना कळली, तर ते जंतूंचा उपयोग युद्धांत आपल्या विरुद्ध करतील, म्हणजे प्रतिबंधाऐवजी आपल्या देशांत रोग पसरवण्याकडे या संशोधनाचा उपयोग करतां येअील. तेव्हां त्यांनी या शास्त्रज्ञांना बजावलें की हा शोध आम्ही तुम्हाला प्रसिद्ध करूं देणार नाही, कारण त्यांत देशाला धोका आहे, आणि सरकारच्या हातांत सत्ता असल्यामुळें शास्त्रज्ञांना मान तुकवावी लागली. त्यांत असेंही दाखवलें आहे की कांही जर्मन हेर या संशोधकांच्या पाळथी-वर होते आणि त्यांनी त्यांना कळवलें की सरकारने कांही म्हटलें तरी तुम्हाला तुमचा शोध प्रसिद्ध करायचा असला तर तो आमच्याकडे द्या, म्हणजे आम्ही तो प्रसिद्ध करून त्याचा सर्वत्र फैलाव करूं, म्हणजे या शास्त्रीय शोधाचा उपयोग आपल्या अिच्छेप्रमाणें सर्व जगाला होअील. पण हें पोलिसाला कळलें आणि हे हेर पकडले गेले.

ही गोष्ट खरी असेल किंवा नसेल, पण अणुस्फोटकांचे बाबतींत मात्र असा प्रकार अिंग्लंडांत व अमेरिकेंत झाला होता हें सर्वांना माहीत आहे. कोणत्याही ज्ञानाचा दुरुपयोग करतां येअील, या दृष्टीने कोणत्याही ज्ञानाचा प्रसार होऊं देतां कामा नये, असेंच ठरवण्याचा हा मार्ग आहे. वरील शास्त्रज्ञांपैकी अेकाने सरकारी अधिकाऱ्याला असें सांगितलें की सांथींना दरवर्षी लक्षावधि लोक बळी पडतात, त्यांना वांचवण्याचा आमचा हा प्रयत्न आहे, याला तुम्ही खीळ घालतां याचा अर्थ काय? पण जगांत लक्षावधि लोक मेले तरी चालतील, पण आपल्या देशाला धोका उत्पन्न होतां नये, हें कोणीही देशभक्त कबूल करील, अितकेंच नव्हे तर आपल्याला या जंतूंचा उपयोग शत्रूंविरुद्ध करतां येअील, असेंही अधिकाऱ्याचें म्हणणें पडलें.

याचा अर्थ असा की कोणत्याही सामान्य माणसाच्या बाबतींत ज्याला आपण हलकटपणा म्हणूं, त्यालाच अशा वेळीं आपण देशाभिमान असें नांव देतों. वास्तविक पाहतां ज्ञानाचा मक्ता कोणत्याही अेका देशाला दिलेला नाही, अणुस्फोटकाचे बाबतींत काय झालें हें सर्वांना माहीत आहे. यासंबंधी संशोधन अनेक देशांत चाललेलें होतें आणि अेच्. जी. वेल्स यांच्या अेका कादंबरींत अनेक वर्षांपूर्वी या स्फोटकाचें भाकीत केलेलें होतें. हिटलरने जर आअिन्स्टाअिन्‌ला यहुदी म्हणून जर्मनींतून पळून जायला लावलें नसतें, तर हा स्फोटक कदाचित् जर्मनींत तयार झाला असता, कारण तो कसा करावा याची माहिती शेवटीं अमेरिकेला आअिन्स्टाअिन्‌कडून मिळाली. हिटलरच्या अडाणी-पणामुळें अमेरिकेचा विजय झाला हें ठीकच झालें, परंतु ही माहिती रशि-याला मिळूं नये म्हणून ही पद्धत गुप्त राखण्यासाठीं अिंग्लंड व अमेरिका देशांतील शास्त्रज्ञांना सक्त ताकीद होती. तथापि रशियांत देखील शास्त्रज्ञ नाहीत असें नाही आणि त्यांना माहिती देणारा अेक अमेरिकनही निघाला आणि ती माहिती गुप्त राहिली नाही आणि आतां रशियाजवळ देखील अणुस्फोटक आहेत असें सिद्धच झालें आहे.

ज्ञान लपवून ठेवणें आतिशय कठिण असतें आणि अणुस्फोटक हा अेकट्या माणसाला घरीं बसून तयार करतां येत नाही, यामुळें तो कसा करावा याची माहिती अनेकांना आपोआप मिळते आणि त्यांपैकी कोणीही लांच खाऊन माहिती पुरवूं शकतो. अशी माहिती गुप्त राहणें अिष्टही नाही, कारण ती राहिली तर अेकच कोणता तरी देश सर्व जगाला पादाक्रांत करील आणि सगळ्या जगाचें स्वातंत्र्य धोक्यांत येअील. बर्ट्रँड रसेलनें असें मत दिलें आहे की सर्व जगावर अेका देशाचें राज्य झालें तर युद्धें थांबतील आणि शांतता राहील, आणि हें राज्य अमेरिकेचें झाल्यास बरें होअील, कारण ते अितर देशांना फारसा त्रास न देतां सुखानें नांदूं देतील. पण मला हें पटत नाही. सत्तेने व्यक्तींचा जसा अधःपात होऊन त्यांना जुलूम करावासा वाटतो,

तसाच देशांचाही होतो. अिंग्लंडचें राज्य आमच्यावर होतें तेव्हां ते जुलूम करीतच होते की नाही? मग अमेरिकाच कां करणार नाही? सर्व जगाचें अेक राज्य होणें अिष्ट आहे हें खरें, पण तें अेका देशाचें अितर सर्वांवर राज्य, असें मात्र होतां कामा नये. कांही बाबतींत सर्व देश अेका तंत्राने चालले पाहिजेत, पण अंतर्गत बाबतींत मात्र प्रत्येक देशाला स्वातंत्र्य पाहिजे, तरच शांतता नांदण्याचा संभव आहे, अेरवीं नाही. अेका देशाचें राज्य होऊन जर शांतता झाली, तर ती गुलामगिरीची शांतता मला अिष्ट वाटत नाही.

आपण ज्याला सुधारणा म्हणतों, ती खरोखर सुधारणा आहे की नाही, असा अेक बिकट प्रश्न हल्ली उपस्थित झाला आहे. मनुष्याला मारून खाणारे हिंस्र पशू आपण जवळजवळ नाहीसे केले, बऱ्याच रोगांवर मनुष्याने विजय मिळविला, आणि आणखी रोगांवर नवे उपचार सांपडत आहेत, आणि या सर्व गोष्टी उत्तम आहेत असेंच वर वर पाहणाराला वाटतें, पण या सर्व गोष्टींचाच परिणाम म्हणजे हल्ली सर्व जगाची वाढलेली लोकसंख्या आणि यामुळें होणारी उपासमार. अधिक धान्य पिकवा हें म्हणणें ठीक आहे, पण ही फोल वल्गना आहे, कारण निदान हिंदुस्थानांत तरी लागवड न झालेली मुबलक जमीन शिल्लक आहे ही अेक थाप आहे. तेव्हां उपासमार टाळण्याचा संततिनियमन हा अेकच मार्ग शिल्लक आहे, पण त्याला राजकुमारी अमृत कौर सारखीं अडाणी धार्मिक माणसें विरोध करीत आहेत. आरोग्यमंत्री होण्याला सर्वांत नालायक कोणी असेल, तर हीं धार्मिक माणसें. पण या बाबतींत गांधीही तितकेच अडाणी असल्यामुळें या बाअींना हें मंत्रिपद मिळालें. अशा नालायक माणसांची कांग्रेसच्या राज्यांत तरी हकालपट्टी होणें कठिण, पण ती झाली नाही तर देशाचें दुर्दैव आहे. या बाअी हिंदुस्थानांत पोपचें राज्य स्थापन करूं पाहतात, कारण किरिस्तांवांना देशापेक्षां धर्माचें महत्त्व जास्त वाटतें. या बाबतींत हिंदूंना अक्कल शिकवणें शक्य असतें, कारण त्यांचा धर्म संततिनियमनाच्या आड येत नाही, पण किरिस्तांवांच्या कारवाया हिंदूंच्या

अंगीं नाहीत, तेव्हां निदान त्यांच्या हातीं सत्ता जाऊं देतां कामा नये, अितकी खबरदारी घेणें जरूर आहे. धर्माच्या पायीं हिंदुस्थानचें अगोदरच नुकसान झालेलें आहे आणि त्यांत आतां हा अेक नवीन धोका निर्माण झाला आहे. सावधान !

प्राथमिक शिक्षकांनी संपावर जाण्याची धमकी दिली होती आणि निवडणुकींच्या वेळीं सरकार जास्त गडबड न करतां मुकाट्याने आपल्या मागण्या कबूल करील अशी त्यांची कल्पना होती. श्री. दोंदे त्यांना चिथावीत होते, पण त्यांचें त्यांत कांहीच नुकसान होणार नाही हें शिक्षकांनी लक्षांत घेतलें आणि संप केला नाही. दारूबंदीमुळें सरकारजवळ पैसे नाहीत हें खरें आहे आणि ही जरी त्यांचीच चूक असली तरी नसलेले पैसे ते अेकदम उत्पन्न करूं शकत नाहीत. लवाद नेमण्याची मागणीही सरकार कबूल करूं शकत नाही, कारण लवादाने शिक्षकांच्या बाजूने निकाल दिला तर त्याप्रमाणें वागण्याची सरकारची ताकत नाही. मग लवाद नेमून काय उपयोग ? आणखी दोन कोटींचा खर्च सरकारला झेपण्यासारखा नाही ही गोष्ट खरी आहे आणि शिक्षकांना संपही झेपणार नाही.

घाटे–परुळेकर समितीचा निकाल मान्य करून सरकारने अनेक शाळांवर संकट आणलें, कारण हा पगार सर्वांना झेपत नाही. झेपत नसेल तर शाळा बंद करा, असें म्हणणें सोपें आहे, पण त्याने जनतेचें नुकसान होअील. हल्लींच्या स्थितींत शिक्षणाचा खर्च अितका आहे की सामान्य लोकांना तो झेपत नाही आणि अन्न अधिक महत्वाचें असल्यामुळें शिक्षण आम्हाला नको म्हणण्याची वेळ येते. शिक्षकांचा घाटे–परुळेकर समितीने फायदा करून दिला आहे, पण शाळाच बंद झाल्या म्हणजे शिक्षक काय करतील ?

तुझी **शारदा**

---

**ढोंगी अमेरिका.** अमेरिकेंतील अेका युनिव्हर्सिटींतील अेका प्रोफे-सराने अमेरिकेचें नागरिकत्व मिळवण्याकरतां अर्ज केला (१९४८). या गृहास्थाचें नांव ॲडॉल्फ श्मिट असून वय ४४ होतें. हा अर्ज अेका न्याया-धीशापुढें गेला, तेव्हां त्याने त्याला नकार देतांना असें कारण सांगितलें की सदर गृहस्थ अविवाहित असल्यामुळें त्याने तेथील कांही स्त्रियांशीं अनैतिक संबंध ठेवला असला पाहिजे. असा संबंध ठेवणें हा गुन्हा होत नसला तरी सामान्यतः समागमाचा हक्क फक्त विवाहितांनाच असतो अशी समजूत असल्यामुळें विशेषतः परदेशी माणसाला असे संबंध ठेवण्याचा हक्क नाही. डॉ. किन्से यांनी नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या आंकड्यांवरून असें सिद्ध होतें कीं अमेरिकेंतील शेंकडा ८५ लोकांचे विवाहबाह्य संबंध असतात. मग ही समजूत वरील न्यायाधीशांनी कोठून आणली?

---

**क्रिस्ती सनातनी.** यूरोपांतील लोक जेवणाचे वेळीं बोटांअेवजीं कांटे चमचे वापरूं लागल्याला सुमारें २५० वर्षें झालीं. त्या वेळीं अेका पाद्र्याने तो भयंकर अधर्म असल्याचा प्रचार केला, कारण अीश्वर आपल्याला अन्न देतो, तेव्हां त्याला बोटें लावण्यांत कमीपणा कां वाटावा? राजेरजवाडे आणि अितर बडे लोक कांटेचमचे वापरण्यांत कमीपणा मानीत असत. हाताला फार चरबी लागली तर ती पावाच्या तुकड्याला पुसायची, अशी या लोकांची पद्धत होती. कांटेचमचे वापरायला समान्य लोकांनीच सुरवात केली आणि मग बड्या लोकांनी त्यांचें अनुकरण केलें. आतां मात्र यूरोपांत कोणी हातांनी जेवूं लागल्यास त्याला रानटी समजतील आणि सभ्य समाजांत त्याला स्थान मिळणार नाही.

---

अेकाने अेका डाक्तराला विचारलें की शंभर वर्षें जगण्याचा कांही उपाय आहे काय? डाक्तर उत्तरला की विडी ओढूं नये, दारू पिऊं नये, आणि कर-मणुकीचीं सर्व साधनें वर्ज्य समजावीं. म्हणजे तुम्ही शंभर वर्षें नच जगलांत तरी जगण्याचा अितका कंटाळा येअील की शंभर वर्षें जगल्यासारखें वाटेल.

---